## निशाण क्र. ११४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी याने आवश्यक पक्षकारांना दाव्यात सामील करून घेणेसाठी व त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा त्याने प्रतिवादींविरूध्द वाटप व निरंतर मनाई करीता दाखल केला आहे. प्रस्तूत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. २, ३, ६ यांनी नि. क्र. ८५ येथे कैफियत देवून वादीचे दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणीव असल्याचे तक्रार केली आहे. वादी प्रतिवादी मधील वाद विषय विचारात घेता प्रतिवादींच्या तक्रारीप्रमाणे दाव्यात पक्षकार समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी प्रतिवादी मधील वादाचे अंतिमत: निराकरण होण्यासाठी मदतच होणार आहे. तरी वादीस प्रस्तुत दाव्याचे कामी नियोजित प्रतिवादी क्र. १३ ते १७ यांना पक्षकार समाविष्ट करणे व त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी. ही दुरूस्ती प्रतिवादींचे कैफियती मधील कथनास अनुसरून करण्यात येत असून सदरहू दुरूस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूपात कोणताही बदल होणारा नाही. उलट अचूक न्यायदानास मदतच होणार आहे. सबब, अर्जात नमूद केलेल्या पक्षकारांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करून तशी दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी नि. क्र. १२९ ला म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार नि. क्र. ११४ च्या अर्जातील मजकूर खोटा व खोडसाळ आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादींनी कैफियत दाखल करून बराच कालावधी लोटला आहे. या दरम्यानचे कालावधीत वादीतर्फे दुरूस्ती मिळणेची मागणी का केली नाही याचा कोणताही उल्लेख अर्जात नाही. संयुक्तिक कारण दिल्याशिवाय वादीचा अर्ज मंजूर करता येण्याजोगा नाही. सबब, अर्ज फेटाळणेत यावा अशी प्रस्तुत प्रतिवादींनी विनंती केली आहे.

३. नियोजित प्रतिवादी क्र. १३ ते १७ यांना नोटीस बजावून देखील ते याकामी गैरहजर राहिले. सबब प्रस्तूत अर्ज नियोजित प्रतिवादी क्र. १३ ते १७ यांचेविरूध्द एकतर्फा चालविणेत येतो.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तूतचा दावा हा वाटपाकरीता आहे. प्रतिवादी क्र. २, ३, ६ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये नियोजित पक्षकार हे या कामी आवश्यक पक्षकार आहेत असे कथन करून त्यांच्या अभावी दावा चालणेस पात्र नाही अशी हरकत घेतली आहे. त्यामुळे नियोजित प्रतिवादी हे आवश्यक पक्षकार आहेत हे स्पष्ट होते. वाटपाच्या दाव्याकामी आवश्यक पक्षकारांना समाविष्ट करणे अनिवार्य असते. सबब या कारणास्तव नियोजित प्रतिवादींना या कामी पक्षकार म्हणून समाविष्ट करणेस व त्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब, वरील कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालील आदेश पारित करीत आहे:

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

३. वादीने पुढील तारखेपर्यंत नियोजित प्रतिवादी यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करावे व दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

४. वादीने वरील प्रमाणे दावा दुरूस्ती प्रत दाखल केल्यानंतर नियोजित प्रतिवादी यांनी विहित मुदतीत कैफियत सादर करावी.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक १६/०२/२०१९